# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २८.०७.२०२६ मंगळवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २८.०७.२०२६ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश—१७ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. ए. व्ही. धुळधुळे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ४८४/२०१८ मधील, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथील अप. क्र. ३९९/२०१८ कलम ३०७ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी राजा लखन सिंग वय ३० वर्षे रा. सी.पी. डब्ल्यू.डी. क्वॉर्टर, टाईप—२, सेमिनरी हिल्स्, नागनाथ मेस जवळ, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस ३०७ भा.दं.वि. अन्वये आजन्म कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ३० दिवस अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २६.०८.२०१८ चे ०२.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत राहणारे फिर्यादीचे पती आलोक चंद्रकांत वडे वय ४० वर्ष यांचा परिचीत आरोपी राजा लखन सिंग याने फिर्यादीचे पतीस स्वतःचे गाडीवर पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्यीतील सेमिनरी हिल्स, टिव्ही टॉवर चौकात नेवुन, तेथे शिवीगाळी केल्याचे कारणावरुन, फिर्यादीचे पतीला हातबुक्कीने व दगडाने मारहाण करुन गंभीर जखमी केले होते. फिर्यादी सौ. पुजा आलोक वडे वय ३५ वर्ष रा. क्रिष्णानगर, आयबीएम रोड, गिट्टीखदान यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक ०१. ०९.२०१८ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. एस. एस. गजा यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती माधुरी मोटघरे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री ऋषिकेश ढाले यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. अभिषेक कश्यप, अंकित सिंग व मपोअं. प्रियंका यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) नंदनवन पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्लॉट नं. १९, फ्लॅट क्र. १०२, श्री अपार्टमेंट, मुरलीनंदन नगर, वाठोडा, पांदन रोड, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती सिमा व्यंकटेशन अय्यर वय ४५ वर्षे हया त्यांचे राहते घरी हॉलमध्ये परिवारासह झोपलेल्या असता, दिनांक २०.०७.२०२६ चे ०२.३० वा. सुमारास, फिर्यादी यांना जाग आल्याने जाणवले की, कोणीतरी त्यांचे घराचा दरवाजा उघडून बाहेर जात आहे. तसेच, त्यांना घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला. फिर्यादी यांना संशय आल्याने, त्यांनी बेडरुमची पाहणी केली असता, बेडरुममधील बालकनीचे दरवाज्याची कडी तुटलेली दिसली व कपाटातील सामान अस्तव्यस्त दिसून आले. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घरात प्रवेश करून, बेडरुममधील सोन्याचे वेग—वेगळे दागिने तसेच, प्लॅटीनम व डायमंडचे दागिने असा एकुण किंमती ७,४८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले. याप्रकरणी फिर्यादी

यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान नंदनवन पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी क्र. १) हिमांशु घनश्याम चांदेकर, वय २५ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५/सी, पाण्याचे टाकीजवळ, मनिषा कोठे यांचे घराजवळ, शक्ति माता नगर, खरबी रोड, नंदनवन, नागपुर आणि २) एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्यांनी संगनमताने वर नमुद घरफोडी गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याचे वेगवेगळे दागिने कि. २,७६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. कैलास देशमाने यांचे मार्गदर्शनात सपोनि. उमाकांत राठोड, पोउपनि. प्रदीप काईट, पोहवा. आशिष तितरमारे, संजय वरवाडे, दिनेश जुगनाहाके, पोअं. संजय, रोहन, प्रविण, राहुल, राकेश, प्रदीप भडादे व रोहन चौधरी यांनी केली.



**२) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०७.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, फुटाळा रॅम्पजवळ पांढरे काळे रंगाचा शर्ट घातलेला एक इसम शस्त्र बाळगून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अनिकेत पुंडलीक ऊईके वय २२ वर्षे रा. न्यु फुटाळा, शिवमंदीर जवळ, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे अंगझडतीत त्याचे कमरेत पॅन्टचे आत एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा मिळाल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. विनोद गोडबोले यांचे मार्गदर्शनाखाली, पोहवा. बलजीत ठाकुर, कमलेश व पोअं. राजु तायडे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— जिवे ठार मारणारा आरोपी अटकेत.**

पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, वार्ड नं. १०, अमरनगर, राममंदीर गल्ली मागे राहणारे फिर्यादी यांचे घराशेजारी धर्मपाल डहाट वय ५० वर्ष, त्यांची पत्नी सौ. वनिता डहाट वय ४५ वर्ष व मुलगा अंकित डहाट

वय ३० वर्ष असे राहतात. एक आठवडा पुर्वीपासून धर्मपाल डहाट यांची साळी सौ. संगिता राजु चौधरी वय ४२ वर्ष ही तिच्या मुलीसह त्यांचेघरी राहावयास आली होती. तिचे नेहमीच डहाट यांचे घरी येणे–जाणे होते. एक वर्षापुर्वी डहाट यांचे घरी भाडेकरु नामे रोशन तराळ हा राहावयास होता. तो एक वर्ष तेथे राहीलेला होता. दिनांक २८.०७.२०२६ चे ०९.४० ते १०.०० वा. चे दरम्यान, धर्मपाल डहाट यांचे घरी त्यांचा पुर्वीचा भाडेकरु आरोपी रोशन निळकंठराव तराळ वय ३० वर्ष ह.मु. राजीवनगर, सरलादेवी शाळेजवळ, पटलेच्या घरी किरायाने, एमआयडीसी, नागपूर याने येऊन, अज्ञात कारणावरुन धर्मपाल डहाट यांची साळी सौ. संगिता राजु चौधरी हिला जिवानिशी ठार करण्याचे उद्येशाने शस्त्राने वार करुन गंभीर जखमी केले. तसेच, धर्मपाल डहाट व त्यांची पत्नी सौ. वनिता हे दोघे घराबाहेर निघाले असता, आरोपीने त्यांनासुदधा शस्त्राने मारुन गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथे नेले असता, सौ. संगिता राजु चौधरी यांना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. जखमी धर्मपाल डहाट व सौ. वनिता डहाट यांचा उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी रमन तपन ढाळी वय २४ वर्ष रा. वार्ड नं. १०, अमरनगर, राममंदीर गल्ली मागे, एमआयडीसी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे एमआयडीसी येथे मपोउपनि. मनिषा जाधव ७०५७४८४५७१ यांनी आरोपीविरुध्द कलम १०३(१),१०९(१) भान्यासं., सहकलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला असून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे धंतोली :– दुकानातुन चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी नरेंद्र वेरहोमल शिवनानी वय ५४ वर्ष रा. प्लॉट क्र. १५३, जरीपटका मेन रोड, नागपूर यांचे पोलीस ठाणे धंतोली हद्दीत यशवंत स्टेडीयम, भगवती मंदीर जवळ फेअरडील इलेक्ट्रानिक नावाचे दुकान आहे. दिनांक २६.०७.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक २७.०७.२०२६ चे १०.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादी हे आपले दुकानाचे शटरला कुलुप लावुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाची खिडकी तोडून, आंत प्रवेश करून, दुकानाचे गल्ल्यातील रोख ३,४४,०००/–रू. तसेच, ०४ नग एलईडी टिव्ही व ०१ मोबाईल असा एकुण किंमती ४,५८,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि. मिरा सोनवणे ९५७९७२१६८२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे अंबाझरी :–** पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत रामनगर, हिल रोड येथे आर्चिड इन्फर्निटी या निर्माणाधीन बिल्डींगचे काम सुरु आहे. तेथे मजुर नामे रितेश धिरनसिंग सरयाम वय ३८ वर्ष रा. कन्हेई गाव, धोबीसरा, जि. शिवनी, मध्यप्रदेश हा पत्नीसह मागील दोन महिन्यापासून काम करुन तेथेच राहत होता. दिनांक २८.०७.२०२६ चे ००.४० वा. चे सुमारास, बिल्डींगवरुन काहीतरी पडल्याचा आवाज आल्याने त्याची पत्नी व इतर यांनी पाहीले असता, रितेश हा जखमी अवस्थेत पडलेला दिसला. त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मृतकास दारुचे व्यसन असल्याचे पत्नीने सांगितले.

यापकरणी फिर्यादी पुजा रितेश सरयाम वय ३६ वर्ष रा. कन्हेई गाव, धोबीसरा, जि. शिवनी, मध्यप्रदेश ह.मु– घटनास्थळी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. सतिश मेश्राम यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** सौ. रुचिका विक्की जाधव वय २५ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, गली क्र. ५, कमल डेकोरेशन जवळ, केडीके रोड, नंदनवन, नागपूर ह्या सोबत कु. रिधीमा विक्की जाधव वय ४ वर्ष हिचेसह दिनांक १४.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरुन उज्जेन येथे जाते असे सांगून निघुन गेल्या. त्या दिनांक १९.०७.२६ पावेतो फिर्यादी आईसोबत संपर्कात होत्या. त्यानंतर संपर्क झाला नाही, घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन रुचिका</u>** रंग— सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, केस— काळे लांब, अंगात— लाल रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. **<u>वर्णन रिधीमा</u>** रंग— गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, केस— काळे, अंगात— जांभळया रंगाचा फ्रॉक घातलेला आहे.

**<u>२) पोलीस ठाणे तहसील</u> :—** प्रणय गजानन गडीकर वय ४५ वर्षे, रा. गोळीबार चौक, गडीकर वाडा, तहसील नागपूर हे दिनांक २४.०७.२०२६ चे १५.३० वा. पोलीस ठाणे तहसील हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ८ इंच, केस— काळे पांढरे, अंगात— आकाशी रंगाचा शर्ट व आकाशी पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** कु. रक्षा किशोर सोमकुंवर, वय २१ वर्षे, रा. प्लॉट क्र. २२१, कुशीनगर, सुनिल किराणाजवळ, जरीपटका, नागपूर ही दिनांक २७.०७.२०२६ चे ०९.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— निळी कुर्ती व काळ्या रंगाची लॅगिन घातलेली आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>४) पोलीस ठाणे मानकापूर</u>:—** कारमेल अॅन्थोनी जॉन/कारमेल दीपक वाघाडे वय ४२ वर्षे रा. गोधनी श्रीराम नगर, गजभिये यांचे घरी किरायाने, नागपूर ह्या दिनांक २१.०७.२०२६ रोजी १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे मानकापूर द्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा—गोल मोठा, बांधा—मजबुत, उंची—५ फुट, केस—काळे लांब, डोळे—काळे, अंगात— पिवळा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>५) पोलीस ठाणे कळमणा</u> :—** संतोष कन्हैया बंजारे वय ५० वर्षे, रा. गुलमोहर नगर, बाजार चौक, कळमणा, नागपूर हे दिनांक ०२.०५.२०२६ पासुन पोलीस ठाणे कळमणा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ४ इंच, केस—काळे, भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह— उजवे हातावर संतोष नाव गोंदलेले आहे.


सौ. रुचिका


रिधीमा


कु. रक्षा


प्रणय


कारमेल


संतोष

**(ईतर)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :– पोलीसांचे वैध रखवालीतुन पळून जाणारा आरोपी ताब्यात.**

पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे दिनांक १८.०७.२०२६ रोजी अप.क्र. ६१४/२०२६ कलम ३०५(३), ३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये दाखल करण्यात आला होता. या गुन्हयाचे तपासात आरापी हर्ष उर्फ एक्का महेंद्र रामटेके वय २५ वर्ष रा. खैरलांजी रोड, रेल्वे चौकीजवळ, गौतम बुध्द वार्ड, तिरोडा जि. गोंदीया यास अटक करण्यात आली होती व आरोपी पोलीस ठाणे हुडकेश्वरचे लॉकअपमध्ये होता. दिनांक २७.०७.२०२६ चे सकाळी ०७.३० वा. चे सुमारास, आरोपी हा हुडकेश्वर पोलीसांचे वैध रखवालीतुन पोलीसांना गुंगारा देवुन पळून गेला होता. पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम २६२ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

आरोपीचे शोधार्थ पोलीस पथके रवाना करण्यात आली होती. तिरोडा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गजानन गुल्हाणे यांनी माहिती प्राप्त होताच, आरोपी येऊ शकतो अशा ठिकाणी पोलीसांतर्फे पाळत ठेऊन, सापळा रचून, नमुद आरोपीस तिरोडा पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अमित वानखेडे व त्यांचे पथकाने दिनांक २८.०७.२०२६ रोजी दुपारी ताब्यात घेतले. तिरोडा पोलीसांनी दिलेल्या माहितीवरुन, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथकाने तिरोडा येथे जाऊन, नमुद आरोपीस ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०५०३८ १/२००२ | कलम ४५७,३८०, ३४ भा.दं.वि. | १)अनिल भवरु टेंभुर्णे रा. भांडेवाडी, पारडी, श्रीकृष्ण मंदीर जवळ, शाहूचे चक्की जवळ कळमणा, नागपुर<br>२) शिखा वाहीद अब्दुल हमीद रा. साई नगर, भारत नगर, भाजीवालेचे घराजवळ, झेंडा जवळ, नागपूर | १०.०८.२०२६ |
| २ | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०५०४२ ८/२००२ | कलम ४२०, भादंवि | शहादत अली अमजद अली रा. अतकर ले आऊट, पंचवटी आश्रम रोड, मलिक शाळे जवळ, निखत बेगम, नागपूर | १०.०८.२०२६ |
| ३ | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३४९३ /२०१४ | कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८,४७१ ३४, भा.दं.वि. | १) शंकर फुलचंद पाटील वय ३६ वर्ष रा. टेकानाका, शेंडे नगर झोपडपट्टी, जरीपटका, नागपुर<br>२) झमोतीबाई समरलाल कंदरे वय ६० वर्ष रा. सावनेर, धापेवाडा रोड, नदी काठावरील झोपडपट्टी, पद्मा | १३.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | चे घराजवळ, सावनेर, नागपूर | |
| ४ | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०२१२३ /२००९ | कलम ४२०, ४६४, ४६७, ४६८,४७१ ३४, भा.दं.वि. | १) मनोज बळीराम धुमाळ वय २६ वर्ष<br>२) सुदर्शन पांडुरंग जाधव वय २२ वर्ष दोन्ही रा. पृथ्वीराज हॉटेल, संत्रा मार्केट,नागपुर | ११.०८.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**